संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान
सुधारीत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**शासन निर्णय क्र. संगाग्रा-२०१६/प्र.क्र.७२/पापु-०८**

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत
लोकमान्य टिळक मार्ग, क्राफर्ड मार्केट,मंत्रालय,मुंबई- ४०० ००१

**तारीख: ०४ जून,२०१६**

<u>वाचा -</u>

१) **शासन निर्णय क्रमांकः पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. अभियान-१००८/प्र.क्र.१७७/पापु-१६,दि.१५ सप्टेबर,२००८**
२) **शासन निर्णय क्रमांकः पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.अभियान १००९/प्र.क्र,९१/पापु-१६,दि.३० मे,२००९**

<u>**प्रस्तावना -**</u>

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मूळ उद्देश ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावण्याचा आहे. तथापि, ग्रामीण भागात अशुध्द पाण्यामुळे, अस्वच्छ परिसरामुळे व वैयक्तिक स्वच्छतेअभावी उद्भवणा-या रोगांमुळे पिडित असलेल्यांची आकडेवारी पाहता हा उद्देश फारसा सफल झाल्याचे न जाणवल्याने, ज्यांचे आरोग्यमान, पर्यायाने जीवनस्तर, उंचावण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, त्या ग्रामस्थांचा सक्रिय व सातत्यपूर्ण सहभाग कार्यक्रमात करुन घेण्याची प्रभावी तरतूद कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत असावी, ग्रामीण जनतेस हा कार्यक्रम आपला वाटावा व त्याचे महत्त्व पटून त्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळवा या दृष्टिकोनातून, सन २०००-०१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबविण्यात येत आहे. तसेच सन २००२-०३ पासून स्वच्छतेशी व ग्रामविकासाशी निगडीत एखाद्या विशिष्ट क्षेत्रात भरीव काम करणा-या ग्रामपंचायतींना तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विशेष बक्षीसे देण्याचा उपक्रमही सुरु करण्यात आला आहे.

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मूळ उद्देश ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावण्याचा आहे. तथापि, ग्रामीण भागात **अशुध्द पाण्यामुळे, अस्वच्छ परिसरामुळे** व वैयक्तिक स्वच्छतेअभावी उद्भवणा-या रोगांमुळे पिडित असलेल्यांची आकडेवारी पाहता हा उद्देश फारसा सफल झाल्याचे न जाणवल्याने, ज्यांचे आरोग्यमान, पर्यायाने जीवनस्तर, उंचावण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, त्या ग्रामस्थांचा सक्रिय व सातत्यपूर्ण सहभाग कार्यक्रमात करुन घेण्याची प्रभावी तरतूद कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत असावी, ग्रामीण जनतेस हा कार्यक्रम आपला वाटावा व त्याचे महत्त्व पटून त्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळवा या दृष्टिकोनातून, सन २०००-०१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबविण्यात येत आहे. तसेच सन २००२-०३ पासून स्वच्छतेशी व ग्रामविकासाशी निगडीत एखाद्या विशिष्ट क्षेत्रात भरीव काम करणा-या ग्रामपंचायतींना तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विशेष बक्षीसे देण्याचा उपक्रमही सुरु करण्यात आला आहे.

केंद्र शासनाद्वारा निर्मल भारत अभियानाच्या निकषांमध्ये व नावात बदल करून दिनांक २ ऑक्टोबर,२०१४ पासून "स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)" हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमाच्या उद्दिष्टानुसार दिनांक ०२ ऑक्टोबर,२०१९ पर्यंत राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेसाठी मोठ्या प्रमाणात वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम करुन घेवून, उघड्यावरील शौचास बसण्याच्या प्रवृत्तीत अमूलाग्र बदल करुन राज्यातील संपूर्ण ग्रामीण भाग "हागणदारीमुक्त" करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये गांवातील संपूर्ण परिसर स्वच्छता शाश्वतपणे प्राप्त करणे हे प्रमुख उद्दिष्ठ आहे. पूर्ण गांव हागणदारीमुक्त होण्यासाठी गांवातील शाळा, अंगणवाडी इत्यादी परिसर पूर्णपणे स्वच्छ असणे अनिवार्य आहे. तसेच केंद्र शासनाद्वारा निर्मल ग्राम पुरस्कार योजना खंडित करण्यात आली आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत देण्यात येणारे काही पारितोषिक हे निर्मल ग्राम पुरस्काराशी संबधित होते.

महाराष्ट्र राज्यात सुमारे २७,८०० ग्रामपंचायती असून सदर सर्व ग्रामपंचायती हागणदारीमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. सदर संपूर्ण ग्रामीण क्षेत्र मर्यादित कालावधीत हागणदारीमुक्त करावयाचे असल्याने ही कार्यवाही सूत्रबध्द पध्दतीने करण्यासाठी केंद्र शासनाच्या निदेशानुसार ऑक्टोबर,२०१६ मध्ये हागणदारीमुक्त गावांची पडताळणी करण्यासाठी विस्तृत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांचे स्वरुप पाहता गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानातील तरतूदींमध्ये बदल करणे/सुधारणा करणे क्रमप्राप्त ठरले आहे.

सदर अभियान राबविण्यात सुटसुटीतपणा व अधिक सोपेपणा, पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने तसेच स्वच्छतेच्या कामात सातत्य राहण्यासाठी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियनांतर्गत आतापर्यंत दिलेले आदेश अधिक्रमीत करुन पुढील प्रमाणे सुधारित आदेश काढण्यात येत आहेत.

## शासन निर्णय -

प्रस्तावनेतील वस्तुस्थिती लक्षात घेता संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांच्या निकषामध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्याचे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

### संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान

**अ) अभियानाची पूर्वतयारी:-**

**१) दरवर्षी दिनांक १ मे ते ३१ मे**

या अभियानांतील स्पर्धेची प्रत्यक्ष सुरुवात २ ऑक्टोंबर पासून होत असली तरी, दिनांक १ मे महाराष्ट्र दिनापासून अभियानाची पूर्वतयारी सुरु होणे अपेक्षित आहे. महाराष्ट्रदिनी अभियानाची घोषणा झाल्यानंतर त्यापुढील कालावधीमध्ये मा. मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता हे राज्यस्तरावर आणि विभागस्तरावर, जिल्हास्तरावर पालकमंत्री तसेच संबंधित जिल्हयाचे पालक सचिव आढावा बैठका घेऊन अभियानाची अंमलबजावणी यशस्वीपणे करण्याचे आवाहन करतील.

या कालावधीमध्ये जिल्हास्तरावर मुख्यकार्यकारी अधिकारी आणि तालुका स्तरावर गट विकास अधिकारी हे तालुक्यातील सर्व ग्रामपंचातींचे सरपंच, ग्रामसेवक यांची सभा तालुका स्तरावर बोलावतील. सदर सभेस संबंधित मा. आमदार, पंचायत समितीतील सर्व जिल्हा परिषद सदस्य, सभापती, उपसभापती, पंचायत समिती सदस्य, सेवाभावी संस्था, कॉलेजचे प्राध्यापक, स्वतंत्र्य सैनिक इत्यादी मान्यवरांना निमंत्रित करण्यात यावे, व सर्वांना अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करावे.

**२) दरवर्षी दिनांक १ जुन ते १५ जुन**

या कालावधी दरम्यान प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंच ग्रामसभा घेतील, ग्रामस्तरावर अभियान यशस्वी करण्यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची बैठक घेऊन अभियानामध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्यासाठी कृती कार्यक्रम देतील. सरपंच आणि ग्रामसेवक पुर्ण गावाचा अभ्यास करुन वैयक्तिक शौचालयाची स्थितीबद्दल माहिती एकत्रित करुन त्याप्रमाणे वैयक्तिक शौचालय बांधकामाचा व संपूर्ण स्वच्छतेबाबतचा कृती आराखडा तयार करतील. तयार आराखडयाप्रमाणे वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामाला सुरुवात करतील.

**३) दरवर्षी दिनांक १६ जुन ते ३१ ऑगस्ट**

या कालावधीमध्ये अभियानात काम करणा-या मंडळींनी वैयक्तिक शौचालय नसलेल्या कुटुंबाकडे शौचालय उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न सुरु ठेवावेत. प्रत्यक्ष बांधकाम करुनवापराविषयी आग्रह धरण्यात यावा. गावातील सर्व कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालये उपलब्ध होतील याची जबाबदारी ग्रामपंचायतींची असेल . या संपूर्ण कालावधीमध्ये वैयक्तिक शौचालय बांधकाम आणि त्याचा वापर करण्याविषयी प्रबोधन यावर भर असेल.

**४) दरवर्षी दिनांक १ सप्टेंबर ते २० सप्टेंबर**

या कालावधीमध्ये गाव हागणदारीमुक्त झाल्याची खात्री करणे, ग्रामपंचायत हागणदारीमुक्तीचा उत्सव साजरा करणे व ग्रामपंचायतीचा हागणदारीमुक्त घोषणेसाठीचा प्रस्ताव ग्रामसेवकाने गट विकास अधिका-यामार्फत जिल्हा परिषदेकडे सादर करावा. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी प्राप्त प्रस्तावांची छाणनी करुन २५ सप्टेंबर पूर्वी हागणदारीमुक्तीची घोषणा करावी.

**५) दरवर्षी दिनांक १ ऑक्टोबर**

दिनांक १ ऑक्टोबर रोजी महिला ग्रामसभा बोलविण्यात यावी यामध्ये अभियानाच्या तयारीची चर्चा करुन त्याबाबतचा कृती कार्यक्रम तयार करण्यात यावा.

**६) दरवर्षी दिनांक २ ऑक्टोबर**

**अभियानाची औपचारिक सुरुवात:-** राज्यातील सर्व ग्रामपंचायतीतून ग्राम सभा घेण्यात येईल. या ग्रामसभेला जिल्हा व तालुका स्तरावरील विशेष अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करतील. यांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हयातील सर्व शासकीय खात्याच्या कर्मचा-यातून करतील. यासाठी जिल्हाधिकारी सहकार्य करतील. या दिवशी सर्व ग्रामपंचायतीत ग्रामसभा व्हाव्यात व त्यास जिल्हा स्तरावरील शासकीय कर्मचारी उपस्थित रहावा यासाठी प्रत्येक जिल्हयाचे जिल्हाधिकारी, सर्व शासकीय खात्यातून आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देतील. या दिवशी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची औपचारीक सुरुवात होईल.

**ब) वातावरणनिर्मिती करीता लाक्षणिक स्वरुपातील कृती कार्यक्रम :-**

यानंतर ग्रामपंचायत स्तरावर पुढीलप्रमाणे अभियानाच्या अंमलबजावणीचा कार्यक्रम सुरु करावा.

१) **दरवर्षी दिनांक ३ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर-** स्वच्छता विषयक जनजागृती उपक्रम, ग्राम सफाई, घनकचरा व्यवस्थापन, कचरा मुक्ती जागृती मोहिम.

२) **दरवर्षी दिनांक ८ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर-** वैयक्तिक स्वच्छता जागृती (नखे काढणे, स्वच्छ आंघोळ, केस धुणे, उवा निर्मूलन) मोहिम, घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहिम.

३) **दरवर्षी दिनांक १५ ऑक्टोबर** - जागतिक हातधूवा◌ं दिनानिमित्त प्रात्यक्षिकासह हात धुण्याची मोहिम.

४) **दरवर्षी दिनांक १६ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर** - शाळा व अंगणवाडी स्वच्छता जागृती मोहिम व तसेच सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिम.

५) **दरवर्षी दिनांक २१ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर** - रस्ते दुरुस्ती, सफाई, श्रमदान मोहिम, जनावरे स्वच्छता मोहिमा, आदर्श गोठा व स्वच्छ जनावरं स्पर्धा.

६) **दरवर्षी दिनांक २९ ऑक्टोबर ते १८ नोव्हेंबर** - पाणी शुध्दता, प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहिम, गटारे सांडपाणी व्यवस्थापन, सांडपाणी पूनर्वापर मोहिम, गावात स्लोगन (घोषवाक्य) स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादी विविध स्पर्धा.

७) **दरवर्षी दिनांक १९ नोव्हेंबर-** जागतिक शौचालय दिना◌ंनिमित्त बांधकाम पुर्ण झालेल्या शौचालयांचा शुभारंभ व ज्या कुटुंबांना शौचालयांचे बांधकाम सुरु करावयाचे आहे तेथे भुमिपुजनाचे कार्यक्रम आयोजित करावेत.

८) **दरवर्षी दिनांक १९ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर** - या कालावधीमध्ये ग्रामपंचायत क्षेत्रात सातत्याने पुढे वर्षभर राबवावयाच्या स्वच्छतेशी निगडीत वर नमूद केलेल्या बाबींची माहिती ग्रामस्थांना व्हावी, त्यातून त्या घटकांबाबत त्यांच्यात जागृती व्हावी याद्दष्टीने या कालावधीत अन्य अनुषंगिक कार्यक्रम आयोजित करता येतील. तसेच या कालावधीत वातावरण निर्मितीसाठी ग्रामपंचायत स्तरावर किंवा त्याखालील महसुली गांव, वार्ड, वस्ती, शाळा, मंडळे स्तरावर त्या त्या दिवसाचे महत्त्व विचारात घेवून वैयक्तिक स्पर्धा आयोजित कराव्यात. जसे आदर्श माता, स्वच्छ घर, स्वच्छ शाळावर्ग, स्वच्छ गोठा, स्वच्छ गल्ली, स्वच्छ वस्ती, उत्कृष्ट पाणी साठवण इत्यादी. गावाने याबाबत स्वयंनिर्णय घ्यावा. यात विविध कला, खेळ, वादविवाद, गाणी म्हणी याही स्पर्धा असू शकतील.

**ग्रामपंचायतींना वरीलप्रमाणे कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे. केलेल्या कामाचे दस्तावेजीकरण करणे आवश्यक आहे.**

**क) ग्रामपंचायतीची तपासणीसाठीची तयारी व तपासणी कार्यक्रमः-**

ग्रामपंचायतींनी उपरोक्त दिलेल्या मोहिमा ठरलेल्या दिवशी राबव्यावात. तसेच अभियानाची आपापल्या स्तरावर आपापल्या तांत्रिक व पारंपारीक ज्ञानाचा उपयोग करुन आपापल्या पध्दतीने तयारी करावी. यासाठी ग्रामपंचायतींनी सेवाभावी संस्था, या अभियानात उत्कृष्ट ठरलेली गावे, तज्ञ व्यक्ती यांची मदत आपापल्या स्तरावर प्राप्त करून घ्यावी.

२) **दरवर्षी दिनांक १ डिसेंबर ते २० जानेवारी -** पंचायत समिती स्तरावरील सर्व ग्रामपंचायतींची तपासणी व निकाल जाहीर करणे.

१) **दरवर्षी दिनांक २६ जानेवारी –** पंचायत समिती स्तरावरील पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीचा सत्कार सोहळा जिल्हा स्तरावर आयोजित करणे.

२) **दरवर्षी दिनांक २५ फेब्रुवारी ते १५ मार्च –** जिल्हा स्तरावरील स्पर्धेतील ग्रामपंचायतींची तपासणी व निकाल जाहीर करणे.

३) **दरवर्षी दिनांक २२ मार्च** –जागतिक जलदिनानिमित्त जिल्हा स्तरावरील विजेत्या ग्रामपंचायातींचा बक्षिस वितरण समारंभ आयोजित करणे.

४) **दरवर्षी दिनांक १० एप्रिल ते २८ एप्रिल –** विभाग स्तरावरील स्पर्धेतील ग्रामपंचयातींची तपासणी व निकाल जाहीर करणे.

५) **दरवर्षी दिनांक १ मे –** महाराष्ट्र दिनानिमित्त विभागीय स्तरावर विजेत्या ठरलेल्या ग्रामपंचायतींचा बक्षिस वितरण सोहळा.

६) **दरवर्षी माहे मे ते जून** – राज्यस्तरावरील स्पर्धेतील ग्रामपंचायतींची तपासणी

७) **दरवर्षी माहे जूलै ते सप्टेबर – राज्यस्तरीय मुख्य तपासणी समितीस निकाल सादर मुख्य तपासणी समितीची बैठक व निकाल जाहीर करणे.**

८) **दरवर्षी दिनांक २ ऑक्टोबर** –राज्यस्तरावरील बक्षिस वितरण समारंभ.

**ड) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत घेण्यात येणा-या स्पर्धा :-**

**I. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा**

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील ग्रामपंचायतींच्या तपासणीसाठी असलेल्या गुणपत्रिकेत बदल केलेला असून सुधारीत गुणपत्रिका **परिशिष्ट- V** मध्ये दिल्यानुसार राहील. त्यानुसार प्रत्येक स्तरावरील समित्यांच्या सदस्यांनी तपासणी करून उपस्थित असलेल्या प्रत्येक सदस्याने स्वतंत्रपणे गुण द्यावेत. समिती सदस्यांनी दिलेल्या गुणांची बेरीज करून त्याला उपस्थित असलेल्या सदस्यसंख्येने भागून जी सरासरी येईल तेवढे गुण त्या ग्रामपंचायतीला मिळतील.

**अ) पंचायत समिती स्तर**

पंचायत समिती स्तरीय तपासणी समितीने या ग्रामपंचायतींची तपासणी करून पंचायत समिती स्तरावरील बक्षीसासाठी प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतीची निवड करावी. पंचायत समिती स्तरावर निवडलेल्या ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणे बक्षीसे देण्यात येतील.

| **पुरस्कार क्रमांक** | **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत यापूर्वी असलेली पुरस्काराची रक्कम** | **या शासन निर्णयान्वये देण्यात येणारी सुधारीत पुरस्कार रक्कम** |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | रु.२५,०००/- | रु.१,००,०००/- |
| दिव्तीय क्रमांक | रु.१५,०००/- | रु.५०,०००/- |
| तृतीय क्रमांक | रु.१०,०००/- | रु.२५,०००/- |

पंचायत समिती स्तरावरील प्रथम व व्दितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायती जिल्हास्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असतील.

**ब) जिल्हा स्तर**

जिल्हास्तरीय तपासणी समितीने, पंचायत समिती स्तरावर निवडलेल्या प्रथम व व्दितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतींची तपासणी करून जिल्हास्तरावरील बक्षीसासाठी प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतीची निवड करावी. जिल्हा स्तरावर निवडलेल्या ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणे बक्षीसे देण्यात येतील.

१) प्रथम क्रमांक - रु. ५.०० लाख
२) व्दितीय क्रमांक - रु. ३.०० लाख
३) तृतीय क्रमांक - रु. २.०० लाख

जिल्हा स्तरावर निवडलेल्या प्रथम व व्दितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायती विभागस्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असतील.

**क) विभाग स्तर**

जिल्हास्तरावर निवडण्यात आलेल्या प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतींची तपासणी दोन टप्प्यात करण्यात येईल. या ग्रामपंचायतींची तपासणी प्रथम राज्यस्तरीय मुख्य संसाधन केंद्रांमार्फत (K.R.C.) करण्यात यावी. K.R.C. यांनी केलेले मूल्यमापन अहवाल विभागस्तरीय तपासणी समितीस तसेच शासनास सादर करावे. तदनंतर सदर मूल्यमापनाची पडताळणी करण्यासाठी विभाग स्तरीय तपासणी समितीद्वारा जिल्हास्तरावर निवडलेल्या प्रथम व व्दितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतींची पुन: तपासणी करून विभागस्तरावरील बक्षीसासाठी प्रथम ,व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतीची अंतिमत: निवड करण्यात येईल. विभाग स्तरावर निवडलेल्या ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणे बक्षीसे देण्यात येतील.

१. प्रथम क्रमांक - रु. १०.०० लाख
२. व्दितीय क्रमांक - रु. ८.०० लाख
३. तृतीय क्रमांक - रु. ६.०० लाख

विभाग स्तरावर निवडलेल्या प्रथम व व्दितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायती राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असतील.

**ड) राज्यस्तर**

राज्यस्तरीय तपासणी समितीने, विभागस्तरावर निवडलेल्या प्रथम व व्दितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतींची तपासणी करून राज्यस्तरावरील प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या बक्षीसासाठी ग्रामपंचायतीची निवड करावी. राज्यस्तरावर निवडलेल्या प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणे बक्षीसे देण्यात येतील.

१) प्रथम क्रमांक - रु. २५.०० लाख
२) व्दितीय क्रमांक - रु. २०.०० लाख
३) तृतीय क्रमांक - रु. १५.०० लाख

**II. विशेष पुरस्कार :-**

जिल्हा,विभाग व राज्यस्तरावर द्यावयाच्या विशेष पुरस्कारासाठी, अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धांतर्गत द्यावयाच्या पारितोषिकासाठी निवडलेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीमधून विशेष पुरस्कार द्यावयाच्या ग्रामपंचायतींची निवड करण्यात येईल. या तीन विशेष बक्षीसांसाठी निवड प्रक्रिया परिशिष्ट II मध्ये नमूद केलेल्या समित्यामार्फत करण्यात येईल. या तिन्ही स्तरावर या पारितोषिकासाठी निवड करतांना, तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीपैकी कुटुंब कल्याण या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतींची निवड, स्व. आबासाहेब खेडकर पुरस्कारासाठी , पाणी व्यवस्थापन या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीची निवड स्व.वसंतराव नाईक पुरस्कारासाठी. तसेच सामाजिक एकता या विषयावर सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीची निवड डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारासाठी करण्यात यावी.

परिशिष्ट VI मधील गुणपत्रिकेनुसार कुटुंब कल्याण या विषयातील उत्कृष्ट कार्य करणा-या ग्रामपंचायतींना आबासाहेब खेडकर यांच्या नावाने, तसेच **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेंतर्गत** पिण्याचे पाणी व सांडपाणी या विषयात उत्कृष्ट कार्य करणा-या ग्रामपंचायतींना वसंतराव नाईक यांच्या नावाने, सामाजिक एकता या विषयात उत्कृष्ट कार्य करणा-या ग्रामपंचायतींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विशेष बक्षीसे देण्यात येतील. या विशेष पुरस्काराच्या रकमा **परिशिष्ट - IV मध्ये** नमूद केल्यानुसार राहतील.

**III) राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धा :-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धेतील निवडीचे निकष व परितोषिके खालीलप्रमाणे राहतील.

अ)**जिल्हा परिषदेचे संपूर्ण कार्यक्षेत्र हगणदारीमुक्त** होऊन जिल्हा हगणदारीमुक्त घोषित **झाल्यानंतर संबधित जिल्हा परिषदेला संबंधित वर्षात राज्यशासनातर्फे** रु. २०.०० लाखाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ व हागंदारीमुक्त जिल्हा परिषद पुरस्कार **देण्यात येईल.**

ब) तसेच, संबंधित वर्षात, ज्या जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील एकूण ग्रामपंचायतीपैकी, यापूर्वीच्या सर्व वर्षात हगणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायती वगळून, उर्वरित ग्रामपंचायतींपैकी ज्या जिल्ह्यातील सर्वात जास्त ग्रामपंचायतीं सदर वर्षात हगणदारीमुक्त होतील (टक्केवारी लक्षात घेता) त्या जिल्हा परिषदेस **रु.१०.०० लाखाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद पुरस्कार** मिळेल. परंतु, या पुरस्कारासाठी संबंधित वर्षात, **जिल्हयातील किमान ५० ग्रामपंचायती हगणदारीमुक्त प्रमाणित (Verify) होणे आवश्यक आहे.**

क) पंचायत समितीचे संपूर्ण कार्यक्षेत्र हगणदारीमुक्त झाल्यानंतर पंचायत समितीला संबंधित वर्षात राज्यशासनातर्फे **रु. ५.०० लाखाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती पुरस्कार** देण्यात येईल.

**इ) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे नियम :-**

१) सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभागी होणे अनिवार्य राहील.

२) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत **प्रत्येक स्तरावर निवडलेल्या ग्रामपंचायती** पुढील स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असतील.

३) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत तपासणी समितीसाठी किंवा बक्षीस वितरण समारंभाच्या आयोजनासाठी ग्रामपंचायती, यांनी कोणत्याही स्वरुपाचा खर्च करू नये. या कामासाठी जिल्हा परिषदांना शासनाकडून निधी वितरीत करण्यात येतो.

४) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामपंचायत स्पर्धेतील सर्व स्तरावरील एका बक्षीसासाठी शक्यतो एकाच ग्रामपंचायतीची निवड करावी. जर, समान गुण प्राप्त झाल्यास विशेष बक्षीसासाठी असलेल्या तीन विषयात (पाणी व सांडपाणी व्यवस्थापन, कुटुंब कल्याण व सामाजिक एकता) ज्या ग्रामपंचायतीला जास्त गुण असतील त्या ग्रामपंचायतीची सदर बक्षीसासाठी निवड करावी. जर, गुणानुक्रम विभागून दिले असतील व त्यामुळे तपासणी करावयाच्या ग्रामपंचायतीची संख्या वाढत असेल तर विशेष बक्षीसासाठी असलेल्या तीन विषयात (पाणी व सांडपाणी व्यवस्थापन, कुटुंब कल्याण व सामाजिक एकता) जास्त गुण मिळाले असतील त्या ग्रामपंचायतीचीच पुढील स्तरावरील स्पर्धेत तपासणी करण्यात येईल.

५) प्रत्येक स्तरावरील तपासणी समित्यांनी त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक ग्रामपंचायतीची तपासणी कधी व किती कालावधीत केली याची नोंद ग्रामपंचायतीच्या शेरेबुकात करावी. त्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच किंवा ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष किंवा ग्रामसेवक यांच्याकडून दाखला घेण्याची आवश्यकता नाही.

६) तपासणी समितीच्या प्रत्येक सदस्याने आपल्यावरील जबाबदारीची जाणीव ठेवून ग्रामपंचायतीने केलेल्या कामाची काटेकोर तपासणी करून मूल्यांकन नि:ष्पक्षपातीपणे करावे. त्यासाठी प्रतिज्ञापत्राचे वाचन ऐच्छीक आहे. प्रतिज्ञापत्राचा नमूना **परिशिष्ट VIII**मध्ये दिला आहे.

७) प्रत्येक स्तरावरील समितीने दिलेला निर्णय हा **अंतिम असेल** त्याबाबत कोणत्याही स्तरावर अपील करता येणार नाही.

८) राज्यस्तरावर प्रथम आलेल्या ग्रामपंचायतीला पुढील ५ वर्षे या अभियानांतर्गत भाग घेता येणार नाही.या व्यतिरिक्त इतर स्तरावरील पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीस पुन: त्याच स्तरावर व क्रमांकावर बक्षीस पात्र झाल्यास त्यांना पुरस्कार रक्कम देय राहणार नाही. परंतू त्यांना त्या क्रमांकाचे पुरस्कार प्राप्त असल्याचे प्रमाणपत्र देय असेल. तथापि, ग्रामपंचायतीचा स्तर व क्रमांकामध्ये वाढ झाल्यास त्यांना त्या पूर्ण रक्कमेचे पुरस्कार देय राहील. अशी वाढ ही राज्यस्तरावरील प्रथम पुरस्कार प्राप्त होईपर्यंत राहील.

९) या अभियानास लाभलेला प्रतिसाद व लोकसहभाग कायम रहावा तसेच स्वच्छतेस/विकास कामास आलेली गती कायम रहावी यास्तव ग्रामपंचायतींनी केलेल्या कामाचे मुल्यांकन नि:ष्पक्षपातीपणे होणे आवश्यक आहे. यासंदर्भात प्रत्येक स्तरावरील तपासणी समितीतील अधिकारी व पदाधिकारी यांची जबाबदारी महत्वाची आहे. त्यांच्या अनुपस्थितीमुळे अचूक मुल्यांकन व योग्य ग्रामपंचायतींची निवड होण्यात अडचणी निर्माण होतात. यास्तव अपवादात्मक परिस्थितीत तपासणी समितीतील किमान २/३(दोन-तृतीयांश) सदस्यांनी तपासणीसाठी हजर राहणे आवश्यक आहे.

अभियानांतर्गत होणारा खर्च "मागणी क्रमांक वाय-२, २२१५-पाणी पुरवठा व स्वच्छता- ०२ जलनि:स्सारण व स्वच्छता- १०७ मलप्रणाल सेवा- ग्रामीण स्वच्छता- पंचवार्षीक योजनांतर्गत योजना- राज्य योजना- (०४) (०५) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी, प्रचार, प्रसिध्दी व बक्षिस योजना (२२१५ १९८८) २६, जाहिरात व प्रसिध्दी" या लेखाशिर्षाखाली घालावा.

ग्रामविकास विभागाद्वारा उपलब्ध केलेल्या तरतूदीतून द्यावयाचे विशेष पुरस्कार आता पूर्णपणे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे हंस्तातरित केल्याने त्यासाठी आवश्यक असणाया - निधीची तरतूद तथा लेखाशिर्ष आणि इतर अनुषांगिक मार्गदर्शक तत्वे नंतरकळविण्यात येईलतोपर्यंत. विशेष पुरस्कारासाठी तपासणी व निवडीची प्रक्रिया ही सदर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सुरु ठेवण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०६०४१६०७०२४९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Kumar

Digitally signed by Rajesh Kumar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e08bc9f719f8ce54a66aed8ed2a521ee2d571facec17b204b286a31e88c58d9, cn=Rajesh Kumar
Date: 2016.06.06 12:06:43 +05'30'

**(राजेश कुमार)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
४) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५) मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य.

६) मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.
८) जिल्हा परिषद अध्यक्ष ,सर्व.
९) विभागीय आयुक्त,विभाग सर्व
१०) जिल्हाधिकारी,सर्व.
११) महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई.
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सर्व.
१३) उपायुक्त (विकास),विभाग सर्व.
१४) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता/पंचायत),जिल्हा परिषद सर्व.
१५) सर्व गटविकास अधिकारी (त्यांना विनंती की, सदर शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती/उपसभापती, पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्रामसेवक याना द्यावी.)
१६) ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई,
१७) नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई.
१८) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
१९) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
२०) निवडनस्ती,पापु-०८

## परिशिष्ट - ।

**जिल्हा स्तरीय ग्राम स्वच्छता अभियान सनियंत्रण समिती:**

**नांव :-** संत गाडगेबाबा जिल्हा स्तरीय ग्राम स्वच्छता अभियान समिती

**गठण :-** जिल्हा स्तरावर मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन या समितीचे गठण करण्यात यावे.

**समितीचे सदस्य :-**

१. पालकमंत्री - अध्यक्ष
२. पालक सचिव - सदस्य
३. अध्यक्ष, जिल्हा परिषद- सदस्य
४. जिल्हाधिकारी- सदस्य
५. मुख्य कार्यकारी अधिकारी - सदस्य सचिव
६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता - सदस्य
७. आरोग्य, महिला/बालविकास, समाजकल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, माहिती, खाते इ. खात्याचे अधिकारी व पदाधिकारी - सदस्य

सदर समितीने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे कार्यान्वय व सनियंत्रण करावे. अभियानाची जिल्ह्यातील अंमलबजावणीची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद यांची राहील.

*************

## परिशिष्ट – II

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामपंचायत स्पर्धेसाठी तसेच ग्राम अभियांनांतर्गत ग्रामपंचायतींना द्यावयाच्या विशेष बक्षीसासाठी निवड समित्यांचे गठन

प्रत्येक स्तरावरील तपासणी समितीने त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतींना भेटी देवून त्यांनी अभियांनातर्गत केलेल्या सर्व कामांची परिशिष्ट-II मधील निकषानुसार काटेकोर तपासणी करावी व त्यातून गुणाक्रमे प्रथम तीन उत्कृष्ट ग्रामपंचायतींची निवड करावी. सदर निवड त्या स्तरावरील शासकीय अधिका-यांच्या उपस्थितीत तपासलेल्या ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक, अन्य सदस्यांची सभा घेवून जाहिर करावी. त्यावेळी गावांना दिलेल्या गुणांची व गुणानुक्रमांची कारणमिमांसा करावी. अर्थात समितीचा निर्णय अंतिम राहील व त्यांला कोठेही आव्हान देता येणार नाही. समितीच्या सदस्यांनी त्यांना आवश्यक वाटेल त्याप्रमाणे प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र गुण देवून प्रत्येक गावासाठी प्रत्येक सदस्याची स्वतंत्र गुणपत्रिका तयार करावी अथवा प्रत्येक सदस्यांनी कच्चे गुणटिपण ठेवून त्यानंतर अध्यक्ष व सर्व सदस्यांचे गुण एकत्र करून प्रत्येक गावासाठी सर्व सदस्यांची स्वाक्षरी असलेली एकच गुणपत्रिका तयार करावी. या गुणांकनाबाबतचा अहवाल निवड समितीतील अध्यक्ष व सर्व सदस्यांच्या सह्या घेवून त्याच स्तरावर नेमून दिलेल्या अधिका-यास सादर करावयाचा आहे. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीला बाबनिहाय मिळालेल्या सरासरी गुणांची गुणपत्रिका निवड समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने त्याच स्तरावरील संबंधित अधिका-यामार्फत प्रत्येक ग्रामपंचायतीस द्यावयाची आहे.

मात्र राज्यस्तरावरील निकाल आवश्यकतेनुसार पत्रकार परिषद घेवून/किंवा अन्य प्रकारे जाहिर करण्यात येईल

## समित्या

**१. प्रथम फेरी – पंचायत समिती स्तर.**

**२. द्वितीय फेरी – जिल्हा स्तर. –**

पंचायत समिती तथा जिल्हा स्तरावरील तपासणी समिती गठित करून मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांनी त्यांच्या स्तरावर विहित कालावधीत तपासणी प्रक्रिया पूर्ण करून पंचायत समिती तथा जिल्हा स्तरावरील निकाल जाहिर करावेत. याबाबत समितीचे गठन करण्याचे पूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांना राहतील.

**३. तिसरी फेरी – विभाग स्तर. –**

अ) टप्पा १- विभागस्तरावरील पात्र ग्रामपंचायतींची तपासणी राज्यस्तरावरील मुख्य संसाधन संस्थामार्फत करण्यात यावी.

आ) टप्पा २- राज्यस्तरावरील मुख्य संसाधन संस्थांनी तपासणी केल्यावर विभागस्तरीय तपासणी समितीमार्फत तपासणी करण्यात यावी.

**टप्पा -२ विभाग स्तरीय समिती :-**

| अ.क्र. | विभाग स्तरीय समिती | |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २ | मुख्य अभियंता,विभाग,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ३ | जिल्हा परिषद अध्यक्ष (त्याच विभागातील कोणत्याही जिल्हा परिषदेचे) | सदस्य |
| ४ | उप संचालक,माहिती व जनसंपर्क,विभागीय कार्यालय | सदस्य |
| ५ | राज्य शासनाचा प्रतिनिधी (उप सचिव,पाणी पुरवठा यांनी निर्देशित केलेले) | सदस्य |
| ६ | उपायुक्त (विकास) | सदस्य सचिव |

**४. चोथी फेरी - राज्य स्तर:-**

अ) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राज्यस्तरीय तपासणी समितीची दोन टप्प्यात रचना करण्यात आली आहे. त्यानुसार **प्राथमिक तपासणी समिती** खालीलप्रमाणे असेल.

| **राज्यस्तरीय प्राथमिक तपासणी समिती** | | **कार्यक्षेत्र** |
|---|---|---|
| उप सचिव व प्रकल्प संचालक,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय | अध्यक्ष | विभागस्तरावरील प्रथम व द्वितीय ग्रामपंचायती. |
| संचालक,वृत्त व जनसंपर्क, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, मंत्रालय,मुंबई | सदस्य | |
| राज्यस्तरावरील प्रथम पुरस्कार प्रप्त ग्रामपंचायतीचे सरपंच | सदस्य | |
| संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था | सदस्य सचिव | |

वरीलप्रमाणे गठीत केलेल्या प्राथमिक तपासणी समितीने राज्यस्तरावरील स्पर्धेतील सर्व ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेट देवून ग्रामपंचायतींच्या कार्यानुसार गुणांकन करावे. या गुणांकनाच्या आधारे ग्रामपंचायतींचा गुणानुक्रम ठरवून त्यासह आपला मूल्यमापन अहवाल खालील **मुख्य तपासणी समितीला** सादर करेल.

**ब) राज्यस्तरीय मुख्य तपासणी समिती पुढीलप्रमाणे असेल.**

| | |
|---|---|
| प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. | अध्यक्ष |
| प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| युनिसेफ प्रतिनिधी | सदस्य |
| उपसचिव व प्रकल्प संचालक ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य -सचिव |

प्राथमिक तपासणी समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर, मुख्य तपासणीस समिती आवश्यकता वाटल्यास प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतीला भेट देवून अंतिम निकाल शासनास सादर करेल.

************

## परिशिष्ट - III

## संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेच्या कार्यक्रमाचा एकत्रित तपशिल

| फेरी क्र. | तपासणीचे कार्यक्षेत्र | बक्षीसासाठी ग्रामपंचायतींची निवड | बक्षीस समारंभाचा दिनांक | बक्षीसाची रक्कम | बक्षीस वितरण कोणाच्या हस्ते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **प्रथम फेरी-** पंचायत समिती स्तरीय तपासणी | पंचायत समिती क्षेत्रातील हगणदारीमुक्त घोषित केलेल्या ग्रामपंचायती | गुणानुक्रमे पहिल्या तीन ग्रामपंचायती निवडाव्यात. | दि.२६ जानेवारी. | ग्रामपंचायती<br>प्रथम - १.०० लाख<br>व्दितीय - ५०हजार<br>तृतीय - २५ हजार | जिल्हा परिषद सदस्य, सभापती, उपसभापती, पंचायत समिती यांच्या हस्ते,तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी. |
| **दुसरी फेरी-** जिल्हा स्तरीय तपासणी | पंचायत समितीतील बक्षीसपात्र ठरलेल्या गुणानुक्रमे पहिल्या दोन ग्रामपंचायती. | प्रत्येक पंचायत समितीतील गुणानुक्रमे पहिल्या दोन ग्रामपंचायतीतून गुणानुक्रमे पहिल्या तीन ग्रामपंचायती निवडाव्यात. | दि. २२ मार्च (जागतिक जलदिन) समारंभासाठी नेमून दिलेले मान्यवर उपलब्ध होवू शकले नाहीत तर संबंधित विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करावे. | ग्रामपंचायती<br>प्रथम - ५ लाख<br>व्दितीय - ३ लाख.<br>तृतीय - २ लाख | जिल्हा पालक मंत्री ,खासदार, आमदार,जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या हस्ते जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी. |
| **तृतीय फेरी** - विभागीय स्तरीय तपासणी | जिल्हा स्तरावर बक्षीसपात्र ठरलेल्या गुणानुक्रमे | प्रत्येक जिल्ह्यातील गुणानुक्रमे पहिल्या दोन ग्रामपंचायतीतून गुणानुक्रमे पहिल्या तीन ग्रामपंचायती निवडाव्यात. | दि.१ मे. | ग्रामपंचायती<br>प्रथम - १० लाख<br>व्दितीय - ८ लाख<br>तृतीय - ६ लाख | बक्षीस वितरण कोणाचे हस्ते करावे हे विभागीय आयुक्तांनी ठरवावे.<br>विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी अथवा प्रथम क्रमांकाच्या गावात. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पहिल्या दोन ग्रामपंचायती. | | | | |
| **चौथी फेरी** राज्यस्तरीय तपासणी (कालावधी मे ते जून) | विभाग स्तरावर बक्षीसपात्र ठरलेल्या गुणानुक्रमे पहिल्या दोन ग्रामपंचायती. | प्रत्येक महसुली विभागातील गुणानुक्रमे पहिल्या दोन ग्रामपंचायतीतून तपासणीअंती गुणानुक्रमे पहिल्या तीन ग्रामपंचायती निवडाव्यात. | दिनांक २ ऑक्टोबर. | ग्रामपंचायती<br>प्रथम - रु. २५ लाख<br>व्दितीय -रु.२० लाख<br>तृतीय -रु. १५लाख | शासन निर्णय घेईल त्या मान्यवरांच्या हस्ते व शासन ठरवेल त्या ठिकाणी. |

***********

<u>परिशिष्ट - IV</u>

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत विशेष पारितोषिकासाठी निवडीच्या कार्यक्रमाचा तपशिल**

| फेरी क्र. | तपासणी समितीचे कार्यक्षेत्र | ग्रामपंचायतींची निवड | बक्षीस समारंभ दिनांक | बक्षीसाची रक्कम | बक्षीस वितरण कोणाच्या हस्ते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ |
| जिल्हा स्तरीय तपासणी | पंचायत समिती स्तरावरील बक्षीसपात्र ठरलेल्या पहिल्या दोन ग्रामपंचायती. | प्रत्येक पंचायत समिती स्पर्धेतील ग्रामपंचायतींतून गुणानुक्रमे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेसाठी निवडलेल्या ग्रामपंचायती वगळून उर्वरित ग्रामपंचायतीतून पाणी गुणवत्ता पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन, सामाजिक एकता व कुटुंब कल्याण या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन ग्रामपंचायती | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील ग्रामपंचायतींच्या बक्षीस वितरण समारंभात सदर बक्षीस वितरण करावे. | **अ) पाणी गुणवत्ता,पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन**<br>**स्व. वसंतराव नाईक पुरस्कार - ग्रापं.**<br>रु. २५ हजार<br>**ब) सामाजिक एकता - स्व. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार- ग्रापं**<br>रु. २५ हजार<br>क) कुटुंब कल्याण - स्व. आबासाहेब खेडकर स्मृती पुरस्कार- ग्रा-.प.<br>रु. २५ हजार | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील ग्रामपंचायतींच्या बक्षीस वितरण समारंभात सदर बक्षीस वितरण करावे. |
| विभागीय स्तरीय तपासणी | जिल्हास्तरावरील बक्षीसपात्र ठरलेल्या पहिल्या दोन ग्रामपंचायती. | प्रत्येक जिल्ह्यातील, विभाग स्तरीय स्पर्धेतील ग्रामपंचायतींतून गुणानुक्रमे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेसाठी | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील | **अ) पाणी गुणवत्ता,पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन-स्व.वसंतराव नाईक पुरस्कार - ग्रापं.**<br>रु. ३० हजार<br>**ब) सामाजिक एकता - स्व.** | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील ग्रामपंचायतींच्या बक्षीस वितरण समारंभात सदर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवडलेल्या ग्रामपंचायती वगळूनउर्वरित ग्रामपंचायतीतून पाणी गुणवत्ता पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन,, सामाजिक एकता व कुटुंब कल्याण या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन ग्रामपंचायती. | ग्रामपंचायतीं च्या बक्षीस वितरण समारंभात सदर बक्षीस वितरण करावे. | **बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार- ग्रापं.**<br>रु. ३० हजार<br>क) **कुटुंब कल्याण - स्व. आबासाहेब खेडेकर स्मृती पुरस्कार- ग्रापं**<br>रु. ३० हजार | बक्षीस वितरण करावे. |
| राज्यस्तरीय तपासणी | विभाग स्तरावर बक्षीसपात्र ठरलेल्या पहिल्या दोन ग्रामपंचायती. | प्रत्येक विभागातून, राज्यस्तरावरील स्पर्धेतील ग्रामपंचायतीमधून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेसाठी निवडलेल्या गुणानक्रमे प्रथम तीन ग्रामपंचायती वगळून उर्वरित ग्रामपंचायतीतून पाणी गुणवत्ता पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन, सामाजिक एकता व कुटुंब कल्याण या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन ग्रामपंचायती. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील ग्रामपंचायतीं च्या बक्षीस वितरण समारंभात सदर बक्षीस वितरण करावे. | **अ) पाणी गुणवत्ता पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन,- स्व. वसंतराव नाईक पुरस्कार - ग्रापं**<br>रु. ३.०० लाख<br>**ब) सामाजिक एकता - स्व. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार- ग्रापं.**<br>रु. ३.०० लाख<br>**क) कुटुंब कल्याण - स्व. आबासाहेब खेडेकर स्मृती पुरस्कार- ग्रापं**<br>रु. ३.०० लाख | शासन निर्णय घेईल त्या मान्यवरांच्या हस्ते व शासन ठरवेल त्या ठिकाणी. |

*************

## परिशिष्ट - V

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा

ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत केलेल्या कामगिरीच्या मुल्यमापनाचे निकष व त्या अनुषंगाने द्यावयाचे गुण

| अ.क्र. | विषय | कमाल गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| मुद्दा क्र. १ | शौचालय व्यवस्थापन | ४० | |
| मुद्दा क्र. २ | सांडपाणी व्यवस्थापन | १० | |
| मुद्दा क्र. ३ | घनकचरा व्यवस्थापन | ५ | |
| मुद्दा क्र. ४ | पाणी गुणवता व पाणी व्यवस्थापन | २० | |
| मुद्दा क्र. ५ | घर/ गाव परिसर स्वच्छता- | ५ | |
| मुद्दा क्र. ६ | वैयक्तीक स्वच्छता | ५ | |
| मुद्दा क्र. ७ | स्मार्ट व्हीलेज संकल्पनेनुसार उपलब्धी | ५ | |
| मुद्दा क्र. ८ | लोकसहभाग आणि सामुहिक स्वयंपुढाकारातून नाविन्यपूर्ण उपक्रम | १० | |
| | **एकूण गुण** | **१००** | |

| अ. क्र | विषय | कमाल गुण | मिळाले ले गुण |
|---|---|---|---|
| १ | **पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन एकूण गुण** | **२० गुण** | |
| | पाणी पुरवठा योजना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असल्यास<br>पाणी पट्टी वसुलीचे प्रमाण<br>१००% असल्यास - ३ गुण<br>७५ - ९९ % असल्यास - २ गुण<br>५१ - ७४ % असल्यास - १ गुण | ३ | |
| | ग्रामपंचायतीकडे स्वनिर्मित पाणी सुरक्षितता आराखडा उपलब्ध आहे. | २ | |
| | गावात पाणी पुरवठा योजनेमधून दिलेल्या घरगुती नळ जोडण्यांची संख्या<br>९१ ते १००% असल्यास - २ गुण<br>५१ - ९० % असल्यास - १ गुण<br>५० % व त्यापेक्षा कमी - ० गुण | २ | |
| | गावातील एकूण सर्व पाणी पुरवठयाच्या सुविधांमधून कुठेही पाणी अनावश्यक वाहत नसणे/गळती नसणे. | २ | |
| | घरगुती नळ जोडण्यासोबत मीटरची उपलब्धता<br>१००% असल्यास - २ गुण<br>५१ - ९९ % असल्यास - १ गुण | २ | |
| | पाण्याचा स्त्रोत, साठवण, पाणी वहन मार्ग, सार्वजनिक वितरणाच्या जागा | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | इत्यादी ठिकाणी स्वच्छता. | २ | |
| | टी.सी.एल. पावडरचा अथवा हायपोचा नियमित वापर, प्रयोग शाळेत पाणी नमूने नियमित तपासणी (रासायनिक तसेच जैविक प्रदुषण) व तपासणीत १००% पाणी<br>नमुने शुध्द आढळल्यास | २ | |
| | गेल्या ३ वर्षात गावात कोणतीही साथ आली नसल्यास व कोणताही जलजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला नसल्यास (वैद्यकीय अधिकारी यांचा दाखला व प्रत्यक्ष विचारणा करून गुण देणे)<br>३ वर्षे - २ गुण<br>२ वर्षे- १ गुण<br>१ वर्षापेक्षा कमी - ० गुण | २ | |
| | पिण्याच्या पाण्याच्या स्रोताचे स्वच्छता सर्वेक्षण करून त्यात आढळलेल्या त्रुटींची पूर्तता केली असल्यास | २ | |
| | Field test kit चा वापर असल्यास आणि पाणी गुणवत्तेसंबंधीच्या सर्व नोंदवह्या अद्यावत असल्यास | १ | |
| २ | **सांडपाणी व्यवस्थापन एकूण गुण** | **१०** | |
| | गावातील सांडपाण्याची शोषखड्डे/ परसबाग, बंदिस्त गटारे व परसबाग इत्यादीव्दारे शास्त्रशुध्द विल्हेवाट व पुर्नवापर<br>१००% सुयोग्य व्यवस्थापन आणि मॅजिक पिट ( जादुई शोषखड्डा ) तंत्रज्ञान वापरले असल्यास - १० गुण<br>१००% सुयोग्य व्यवस्थापन ( मॅजिक पिट शिवाय ) असल्यास - ५ गुण<br>७५ ते ९९% सुयोग्य व्यवस्थापन असल्यास - ३ गुण<br>५१ ते ७४% सुयोग्य व्यवस्थापन असल्यास -२ गुण<br>५०% किंवा त्यापेक्षा कमी सुयोग्य व्यवस्थापन असल्यास - ० गुण<br>(गटारे उघडी असल्यास किंवा सांडपाण्याची डबकी साठलेली असल्यास तसेच सांडपाण्याची दुर्गंधी येत असल्यास २ गुण कमी करावेत) | १० | |
| ३ | **शौचालय व्यवस्थापन एकूण गुण** | **४०** | |
| | गावातील १००% कुटुंबांना शौचालयाची सुविधा( किमान ९०% कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालय) असल्यास आणि उघड्यावरील हागणदारी पूर्णपणे बंद झाली असल्यास - ३० गुण | ३० | |
| | गावातील अंगणवाडीत स्वच्छतागृह असल्यास तसेच हात धुण्यासाठी व्यवस्था असल्यास | २ | |
| | गावातील शाळा,महाविद्यालय व इतर शैक्षणिक संस्थेत स्वच्छतागृह (मुलांमुलींसाठी स्वतंत्र) असल्यास तसेच हात धुण्यासाठी व्यवस्था असल्यास | २ | |
| | गावातील शासकीय, निमशासकीय इमारती, कार्यालये, सहकारी संस्था, महिला मंडळ, युवक मंडळ अशा संस्थात्मक ठिकाणी पुरेशी शौचालये व मुतारींची व्यवस्था व वापर तसेच हात धुण्यासाठी व्यवस्था असल्यास | २ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | गावात लग्नसमारंभासारख्या प्रसंगी तसेच बाजार, एस.टी.स्टॅण्ड, यात्रास्थळे, पर्यटनस्थळे अशा जादा व्यक्ती येणा-या सार्वजनिक ठिकाणी पुरेशी शौचालये व मुतारींची व्यवस्था व वापर तसेच हात धुण्यासाठी व्यवस्था असल्यास | २ | |
| | पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून शौचालये योग्य अंतरावर आणि तांत्रीकदृष्टया व पर्यावरणदृष्टया योग्य असल्यास असल्यास | २ | |
| ४ | **घन कचरा व्यवस्थापन एकूण गुण** | ५ | |
| | घरोघरी कचरापेट्या व सार्वजनिक ठिकाणी कचरापेट्या **पुरेशा संख्येने असून त्याचा नियमित वापर होत** असून कचरा गोळा करण्यापुर्वी प्रत्येक घरात कच-याचे ओला (प्रक्रीया करता येण्यासारखा) व सुका ((प्रक्रीया न करता येण्यासारखा) तसेच प्लॅस्टीक कचरा असे रोज वर्गीकरण होत असल्यास | २ | |
| | त्याप्रमाणे गावात नियमित कचरा उचलला जात असल्यास व कचरा वाहून नेण्यासाठी सातत्यपूर्ण व स्वतंत्र व्यवस्था केली असल्यास | १ | |
| | गावातील १००% ओल्या कच-याचे भुनॅडेप/नॅडॅप/गांडुळखत/कंपोष्ट खत इत्यादी मार्गाने खतात रुपांतर करण्यात येत असल्यास तसेच आरोग्य केंद्र, दवाखाने व रुग्णालये येथून निर्माण होणारा इतरांच्या आरोग्यास घातक ठरणा-या कच-याचे शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट लावली जात असल्यास | १ | |
| | कच-यापासून आर्थिक उत्पन्न घेण्यात येत असल्यास | १ | |
| ५ | **घर, गांव, परिसर स्वच्छता एकूण गुण** | **५** | |
| | गावातील रस्ते, गल्ल्या, घरासमोरील अंगणे, परसदारे याची रचना, स्वच्छता व सजावट, गाव व परिरसरात फुलझाडे, वृक्षसंवर्धन | २ | |
| | गावातील जनावराच्या मलमूत्राची शास्त्रशुध्द पध्दतीने व्यवस्थापन व असलेल्या गोठयांची/ खुराडयांची शास्त्रशुध्द व्यवस्था, | २ | |
| | गावात कोठेही माशा, चिलटे व डासांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना व या किटकांचा प्रादुर्भाव नसल्यास उदा.गप्पी मासे यांचा बंदोबस्त करण्यासाठी गावपरिसरातील मोकळया जागा/मैदानांवरील गाजर गवत इ./वेडी बाभळ इ. झाडोरा तसेच पाणी साठयावरील हायसिंथ इत्यादी काढून टाकले असल्यास (चा-यासाठी असलेले गवत सोडून ) | १ | |
| ६ | **वैयक्तिक स्वच्छता एकूण गुण** | **५** | |
| | शाळकरी, अंगणवाडीतील मुला-मुलींची नखे, केस, गणवेश, कपडे इत्यादीचा स्तर तसेच, आंघोळ, मलमुत्र विसर्जन, हात धुण्याच्या सवयी (Random sampling पध्दतीने) योग्य असल्यास | २ | |
| | गावातील महिला, युवक, युवती, विद्यार्थी, वृध्द गृहस्थ यांच्या पिण्याच्या पाणी घेण्याच्या सवयी व शौचानंतर, जेवणापूर्वी व जेवणानंतर हात धुण्याच्या सवयी (प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती इत्यादीव्दारे तपासून गुण द्यावेत) | २ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | गावात/घरात/शाळेत/सरकारी कार्यालये कुठेही थुंकणे, पिचकारणे असे प्रकार न दिसणे. | १ | |
| ७ | **स्मार्ट व्हीलेज संकल्पनेनुसार उपलब्धी एकूण गुण** | **५** | |
| | दुरध्वनी, संगणक सुविधा, इंटरनेट, WIFI, करभरणा व इतर आर्थिक व्यवहारासाठी ग्रामपंचायतीकडे ऑनलाईन सुविधा उपलब्ध | १ | |
| | CCTV व अन्य साधनांच्या माध्यमातुन गाव पातळीवर सनियंत्रण व सुरक्षिततेविषयी काळजी घेणारी व्यवस्था असल्यास | १ | |
| | गावातील सर्व व्यक्तीकडे आधारकार्ड असणे किंवा त्यासंबंधीची प्रक्रिया पुर्ण असणे | १ | |
| | गावातील बहुतांश कुटुंबाकडे जनधन/सामान्य बँक खाते उपलब्ध असणे | | |
| | ग्रामपंचायतीला ISO मानांकन असल्यास आणि ग्राहक तक्रार निवारण प्रणाली उपलब्ध असल्यास | १ | |
| | गावातील सर्व व्यक्तीकडे आधारकार्ड असणे किंवा त्यासंबंधीची प्रक्रिया पुर्ण असणे | १ | |
| ८ | **लोकसहभाग आणि वैयक्तिक व सामुहिक पुढाकारातून गावविकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम एकूण गुण** | **५** | |
| | गावातील एकात्मकता व सर्वधर्मसहभाव, गावात गेल्या ५ वर्षात एकही धार्मिक/जातीय दंगल/तेढ झाली नसल्यास | २ | |
| | गावात अतिक्रमणे नसल्यास व गावातील सार्वजनिक जागा सार्वजनिक बाबींसाठीच वापरल्या जात असल्यास | १ | |
| | गावाने विकासाची कामे लोकसहभागातून, लोकवर्गणीतून केली असल्यास (पुनर्भरण/शाळा /ग्रामपंचायत/रस्ते/ जलसंधारण कामे इत्यादी) | २ | |
| | **एकूण सर्व** | १०० | |

***********

## परिशिष्ट – VI

कुटुंब कल्याण – स्व. आबासाहेब खेडेकर स्मृती पुरस्कार गुणपत्रिका

| अ.क्र. | मुद्दा | कमाल गुण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कुटुंब नियोजन<br>एका अपत्यावर कुटुंब नियोजन केलली जोडपी – ३<br>दोन अपत्यावर कुटुंब नियोजन केलली जोडपी – २<br>गावातील पात्र पुरुषांशी शस्त्रक्रिया केलेल्या पुरुषांच्या प्रमाणानुसार गुणांकन – ५ | १० | |
| १ | लोकसंख्या वाढीचे प्रमाण<br>राज्यापेक्षा कमी टक्केवारी – ५<br>राज्याएवढी किंवा राज्यापेक्षा जास्त टक्केवारी- ३ | ५ | |
| २ | स्त्री लोकसंख्येचे पुरुष लोकसंख्येशी प्रमाण<br>(त्या-त्या कालावधीतील जनगणनेनुसार) –<br>गावातील एकूण लोकसंख्येशी ५०% पेक्षा अधिक – ५<br>५०% पेक्षा कमी – ३ | ५ | |
| ३ | एक किंवा दोन अपत्ये असलेल्या कुटुंबांचे गावातील एकूण कुटुबांशी प्रमाण<br>५१ ते १००% प्रमाण – ५<br>५०% पर्यंत प्रमाण – ३ | ५ | |
| ४ | गावातील त्या वर्षातील जन्म झालेल्या अपत्यांशी ग्रामपंचायतीकडे नोंदणी असलेल्या अपत्यांचे प्रमाण – २ | ५ | |
| | एकूण गुण | ३० | |

***********

## परिशिष्ट -VII

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियांनातर्गत ग्रामपंचायती,पंचायत समित्या व जिल्हा परिषदा यांना प्राप्त झालेल्या रोख बक्षीस रकमेचा विनियोग करण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.**

### १. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतर्गत पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती :-

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत पंचायत समितीस्तरापासून राज्यस्तरापर्यंत ग्रामपंचायतींना मिळालेल्या बक्षीस रकमेचा विनियोग संबंधित ग्रामपंचायतींनी प्रामुख्याने आपल्या क्षेत्रातील विकास कामासाठी करणे आवश्यक आहे. खाली नमूद केल्यानुसार बक्षिसाच्या रक्कमेतून खर्च करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार ज्या ग्रामपंचायतीला बक्षिस मिळाले आहे त्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला असतील. याबाबत निर्णय घेण्यासाठी आवश्यकता भासल्यास विशेष ग्राम सभा बोलावून त्या सभेत विनियोगाबाबत निर्णय घेण्यात यावा. या ग्रामसभेसाठी ग्रामपंचायतीच्या एकुण मतदारांपैकी किमान ५०% मतदार उपस्थित असणे आवश्यक आहे. मात्र या बक्षीस रकमेतून कोणत्याही प्रकारच्या वैयक्तिक लाभाच्या योजना अनुज्ञेय नाहीत.

१. बक्षिस रक्कमेपैकी कमाल २% पर्यत खर्च बक्षिस मिळाल्यानिमित्त संबंधीत गावात आयोजित सोहळयासाठी व अनुषंगीक बाबीवर खर्च करता येतील.

२. उर्वरित रक्कम ग्रामपंचायतीच्या कोणत्याही सामूहिक विकास योजनांवर खर्च करण्यास तसेच ग्रामपंचायत आर्थिकदृष्टया व प्रशासकियदृष्ट्या सक्षम होण्याच्या दृष्टीने तसेच जनतेचे आरोग्यमान उंचावण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी खर्च करण्यास अनुमती आहे. मात्र या कामावरील देखभाल दुरूस्ती अथवा अन्य अनुषंगिक खर्चासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त निधी देण्यात येणार नाही.

३. तसेच, या रकमेतून कोणत्याही प्रकारचा वैयक्तिक लाभ अनुज्ञेय नसल्यामुळे पाणी पुरवठा योजनेसाठीची विद्युत देयके ,देखभाल व दुरस्ती करण्यास अनुज्ञेय नाही.

ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची राहिल. ग्रामसभेच्या निर्णयानुसार खर्च करुन त्याचे हिशोब ठेवणे व ग्रामसभेला अहवाल सादर करणे, आणि संबंधित यंत्रणाना याबाबत आवश्यक व इतर माहिती सादर करण्याची जबाबदारी सरपंच व ग्रामसेवक यांची राहिल. जिल्हा परिषदांनी या सूचना, बक्षीस मिळविणाया-ग्रामपंचायतींच्या वेळोवेळी निदर्शनास आणाव्यात. तसेच या सूचनांनुसार ग्रामपंचायती खर्च करीत आहेत, याची कालबध्द तपासणी करावी. ज्या प्रकरणात या सूचनांचे उल्लंघन झाले असल्याचे आढळून येईल त्या प्रकरणात संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामसेवकावर आवश्यक ती कारवाई तातडीने करावी व त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

**२. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हापरिषद स्पर्धेअंतर्गत जिल्हा परिषदांना व स्वच्छ पंचायत समित्यांना मिळालेल्या बक्षीस रकमेचा विनियोग :**

१. पारितोषिकाची रक्कम प्रथम जिल्हा परिषदेच्यापंचायत/ समितीच्या स्वनिधीत जमा करावी.

२. या रकमेतून कोणत्याही परिस्थितीत वेतन व वेतनेतर बाबी तसेच दैनंदिन स्वरुपाचा सादिल खर्च करता येणार नाही. तसेच वाहन खरेदी,वाहनाचा इतर खर्च करता येणार नाही.

३. जिल्हा परिषदेस/पंचायत समितीस सदर पारितोषिक मिळण्यासाठी ज्या पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी इचे. परिश्रम कारणीभूत असतील, त्यांना रोख पारितोषिके देऊन त्याचा सन्मान करावा. ही निवड सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करावी. त्यासाठी पारितोषिकाच्या एकुण रक्कमेपैकी जास्तीत जास्त ५% रक्कम खर्च करता येईल. मात्र वैयक्तिक बक्षीसाची रक्कम, जिल्हा परिषद स्तरावर रु.१०,०००/- पेक्षा व पंचायत समिती स्तरावर रु. ५०००/- पेक्षा अधिक असू नये.

४. एकूण पारितोषिकाच्या रक्कमेच्या १५% पर्यत खर्च, जिल्हा परिषदेच्यापंचायत/ समितीच्या कार्यालयीन सुधारणा,संगणकीकरण,इमारतीची डागडुजी यासाठी, सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार करता येतील.

५. एकूण पारितोषिकाच्या रक्कमेच्या कमाल **३० %** पर्यत खर्च, जिल्हा परिषदेच्या/पंचायत समितीच्या कार्यालयातील व परिसरातील स्वच्छता व सजावटीसाठी सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार खर्च करता येतील.

६. उर्वरित ५०% रक्कम जिल्हा परिषदेच्यापंचायत/ समितीच्या कार्यक्षेत्रात स्वच्छतेशी निगडीत सार्वजनिक कामाकरीता खर्च करण्यात यावी. मात्र यातून देखभाल दुरूस्ती वरील खर्च न करता स्थावर स्वरूपाची कामे करण्यात यावीत. यातून प्राथम्याने शासकिय/निमशासकीय संस्थांची कार्यालये, एसटी. स्टँड, बाजार, पर्यटन स्थळे इत्यादी गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खर्च करावी.

सर्वसाधारणसभेने घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी / पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांची राहिल. सर्वसाधारणसभेच्या निर्णयानुसार खर्च करुन त्याचे हिशोब ठेवणे व सर्वसाधारणसभेला अहवाल सादर करणे, आणि संबंधित यंत्रणाना याबाबत आवश्यक व इतर माहिती सादर करण्याची जबाबदारी जिल्हापरिषदेतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) आणि पंचायत समितीतील गट विकास अधिकारी यांची राहिल.

**********

## परिशिष्ट – VIII

**<u>प्रत्येक स्तरावरील, प्रत्येक गावाच्या तपासणीपूर्वी करावयाची प्रतिज्ञा</u>**

मी/आम्ही,----------------------स्तरीय तपासणी समितीचे अध्यक्ष/सदस्य संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना स्मरुन अशी प्रतिज्ञा करतो की, या स्पधेच्या तपासणीसाठी शासनाने ठरवून दिलेल्या पध्दतीने, नि:स्पृहपणे व कोणताही दुजाभाव न करता आम्ही या गावाची तपासणी करु. ही तपासणी करताना गावातील कोणत्याही घटकाने अंतर्गत अथवा बाहेरुन, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची गंभीर दखल घेऊन सदर गावास स्पर्धेतून बाद करण्याची शिफारस आम्ही शासनाकडे करु. तसेच अशा कोणत्याही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबावाला बळी न पडता आम्ही आमची तपासणी निरपेक्षपणे करुन गावक-यांनी केलेल्या कामाची सुस्पष्ट व योग्य अशी नोंद घेऊन गुणांकन करु. तपासणी चमूतील घटक म्हणून मी वरीलप्रमाणे शासनास व या गावातील प्रत्येक घटकास त्यानुसार या प्रतिज्ञेद्वारे ग्वाही देत आहे.

**सही/-**
**(तपासणी समितीचे अध्यक्ष व सदस्य)**